# पगारातून कर्ज कपात (कलम ४९) सावधान !!

पतसंस्थेच्या सदस्यास पतसंस्थेच्या प्रित्यर्थ करारपत्र करून सदस्य ज्या आस्थापनाच्या सेवेत आहेत त्या व्यवस्थापनाकडून / मालकाकडून सदस्याच्या वेतनातून करारपत्रात विनिर्दीष्ट करता येईल अशी पतसंस्थेला प्रदेय असणारी कोणतीही रक्कम करारामध्ये ठरल्याप्रमाणे हप्त्या – हप्त्यामध्ये कापून घेण्यास व त्याप्रमाणे अशी कापलेली रक्कम त्या कर्मचाऱ्याच्या म्हणजेच सदस्याच्या पतसंस्थेला कर्जाची परतफेड करण्यासाठी जी तरतुद आहे तसेच ही परतफेडीची रक्कम कपात करण्यास तो सदस्य सक्षम असेल ह्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ मध्ये म्हटले आहे.

म्हणजेच पतसंस्थेचा सदस्य हा अन्य ठिकाणी पगारी नोकर असल्यास त्याच्या पगारातून पतसंस्थेबरोबर करार केल्याप्रमाणे पगारातून हप्ते कापून त्या आस्थापनाने / मालकाने ती रक्कम पतसंस्थेकडे सुपूर्द केली पाहिजे. परंतु हप्त्यापोटी जी रक्कम कपात केली असेल ती वेतन प्रदान अधिनियम, १९३६ (पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट)प्रमाणे ज्या दिवशी पगार वाटण्यात आला असेल त्याच दिवशी कपातीची रक्कम पगाराचा एक भाग समजून पतसंस्थेला कलम ४९ (२) ला अधिन राहुन दिली पाहिजे. म्हणजेच पतसंस्थेचा सदस्याचे जो पगारी नोकर आहे, त्याला वेतन प्रदान अधिनियम, १९३६ चा हा कायदा लागू असल्याने त्याचे पालन करण्याची जबाबदारी अस्थापनाची आहे. शिवाय जो पर्यंत कर्जाची रक्कम पूर्णपणे व्याजासह परतफेड होत नाही, तो पर्यंत अस्थापन ही कपात थांबवू शकत नाही. आणि कपात केलेली रक्कम जर मालकाने वेळेत त्याच्या वेतनातून कापून घेण्यास कसूर केला किंवा कपात केलेली रक्कम पतसंस्थेत भरण्यास कसूर केली तर हा मालकाच्या बाबतीतला गुन्हा आहे. त्यासाठी व्याजदराच्या दीडपट दराने त्यावरील व्याज देण्यास मालक व्यक्तीश: जबाबदार असतो, व अशी व्याजासह रक्कम निबंधकाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे मालकाकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीस कायद्यास पात्र आहे.

मात्र भारताच्या संविधानाच्या अंतर्गत रेल्वे, खाणी व तेल क्षेत्रामध्ये कामावर असणाऱ्या व्यक्तींना ही तरतुद लागू नाही हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. करार केल्याप्रमाणे पगारातून हप्ते कापून घेण्याचे बंधन मालकावर आहे. व ती कापून घेतलेली रक्कम संस्थेला देण्यास मालक व्यक्तीश जबाबदार ठरतो व तसे न केल्यास मालक किंवा त्याचा प्रतिनिधी किंवा संचालक किंवा व्यवस्थापक किंवा सहव्यवस्थापक किंवा अधिकार दिलेला संबंधित अधिकारी सहकार कायद्याच्या कलम१४६ (ब) नुसार शिक्षेस पात्र होतो.

कलम १४६ (ब) म्हणजे '' कोणत्याही मालकाने किंवा अशा मालकाच्या वतीने काम करणाऱ्या प्रत्येक संचालक, व्यवस्थापकाने, चिटणीसाने किंवा अन्य अधिकाऱ्याने पुरेशा कारणाशिवाय कलम ४९ (२) प्रमाणे कसूर केल्यास तो अपराधी ठरतो '' व तो अपराध सिध्द झाल्यास कलम १४७ नुसार त्या वरीलप्रमाणे मालकास किंवा संबंधितास ३ वर्षाची असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा किंवा ५०००/– रू. दंड किंवा दोन्ही शिक्षा देण्याची स्पष्टपणे कलम १४७ मध्ये तरतुद आहे.

वरील कायद्यातील तरतुदीनुसार आपल्या लक्षात येईल की, पगार कपातीचे कर्ज (कलम ४९), कलम १४६ (ब) व कलम १४७ (ब) हे अत्यंत महत्वाचे संरक्षक कवच पतसंस्थांना या वसुलीसाठी आहे. तसेच यापुढील महत्वाचे कलम १४८ नुसार या अपराधाची महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांच्या

न्यायालयापेक्षा कमी दर्जाचे कोणतेही न्यायालय या अपराधाची न्याय चौकशी करू शकत नाही, व निबंधकाच्या पूर्व परवानगीशिवाय या संबंधात कोणताही खटला दाखल करता येत नाही हे आणखी वैशिष्ट आहे.

वरील तरतुदी या पगारातून कपात कर्जाच्या संबंधातील जरी असल्या तरी अलिकडच्या काळात या कलमाच्या अंतर्गत पतसंस्थांना लाखो रूपयांचा गंडा घालणारे महाभाग आढळतात. मुंबईसह राज्यातील अनेक पतसंस्थांना याबाबत लाखो रूपयांचा फटका बसुन पतसंस्थांशी कटकारस्थान करून फसवणूक झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यासाठी पतसंस्थांनी सावधान राहणे आवश्यक आहे.

कलम ४९ अंतर्गत सदस्याला कर्ज पुरवठा करणे हे अत्यंत सुरक्षित, सुरळीत, सोपे व अत्यल्प खर्चाचे काम आहे शिवाय वसुली १०० टक्के नियमित आहे. याच कारणास्तव पतसंस्था वाहनावरील किंवा अन्य कर्ज पुरवठा करणाऱ्यावर भर नव्हता या कर्ज पध्दतीकडे वळणे साहजीक आहे. परंतु काही अपवादात्मक फसवणूकीचे प्रकार नुकतेच उघडकीस आल्यामुळे अनेक पतसंस्था लाखो रूपयांच्या या फसवणुकीस बळी पडल्या आहेत. त्याचा तपशिल खालिलप्रमाणे :–

कलम ४९ अंतर्गत कर्ज मागणारा पतसंस्थेचा संबंधित सदस्य की, जो नुकताच कर्जासाठी सदस्य झाला आहे अशी व्यक्ती एखाद्या कंपनीचे खोटे / बनावट कामास असल्याचे पत्र, बनावट पॅनकार्ड, बनावट वेतनाची स्लीप, बनावट रेशनकार्ड बनावट जामीनदार – फोटो (व्यक्ति एक फोटो दुसऱ्याचा) इत्यादी कागदपत्राच्या आधारे हे कर्ज पतसंस्थांकडून घेतात. व पतसंस्था यास बळी पडून दिलेले अस्थापनाचे / कंपनीचे अंडर टेकिंग तसेत वेतन स्लिप व कामास असल्याचे प्रामणपत्र हे धांदात खोटे असते. पतसंस्था असे कर्ज देताना कर्जदार व जामीनदार यांच्या निवासस्थानाचे, कंपनीचे / आस्थापनाचे प्रत्यक्ष जागेवर जावून व दिलेल्या वेतनाची पावती त्या अस्थापनातील अधिकृत अधिकाऱ्याकडे जावुन त्याची खातरजमा करीत नाहीत आणि त्याचाच हा दुष्परिणाम आहे. हुबेहुब इंन्कम टॅक्सचे बनावट पॅनकार्ड, पतसंस्थांमध्ये सादर करून / दाखवून या प्रकरणी मोठी फसवणूक होते. यासाठी याचीसुध्दा प्रत्यक्ष खातर जमा इन्कम टॅक्सच्या नजीकच्या शाखेत जाऊन करणे आवश्यक आहे.

उदाहरण द्यायचे झाले तर, एखाद्या पतसंस्थेमधुन अशा ४९ कलमाखाली दिलेल्या एकूण कर्जाच्या केवळ १० टक्के अशी बनावट कर्जे दृष्टीक्षेपात आली तरी पतसंस्थेच्या एकंदरीत आर्थिक व्यवहारावर याचा प्रचंड दुष्परिणाम होवून झालेल्या कामकाजाबद्दल व निष्काळजीपणाबद्दल पतसंस्थांचे कर्मचारी व संचालकमंडळसुध्दा कारवाईस पात्र ठरतात. कारण कर्ज मंजूरी आणि वितरण हे सहकार कायद्याप्रामाणे व उपविधीस अधीन राहून व दक्षता घेवून करण्याची कायदेशीर जबाबदारी वरील सर्वांची आहे. त्यामुळे कुठलेही भविष्यातील अरिष्ठ याबाबतीत येथुनपुढे संस्थेवर येवू नये म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अंतर्गत पतसंस्थांनी दिलेले व द्यावयाचे कर्ज याबाबतीत सावधानता बाळगावी व वेळीच सावध व्हावे. यासाठी या अग्रलेखातून ऊहापोह केला आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**